**निविदा सुचना क्र. ८, वर्ष २०१६—१७ करिता**
**वसतीगृहासमोरील दुकाने भाडे तत्वावर देणेबाबत शर्ती व अटी**

१. प्रत्येक दुकानाकरीता प्रती दुकान/प्रती माह रू. २५०० (दोन पाचशे फक्त) विद्युत भाडे वगळुन किमान भाडे राहील. तथापी निविदा प्रक्रियेमध्ये उपरोल्लेखीत किमान दरापेक्षा जास्तीची निविदा प्राप्त झाल्यास सर्वात जास्त किंमतीची निविदा मान्य करण्यात येईल.

२. प्रत्येक दुकानाकरीता रूपये २०,०००/— (वीस हजार फक्त) सुरक्षा रक्कम विद्यापीठाकडे जमा करावी लागेल. करारनाम्याची मुदत संपल्यानंतर सदर रक्कम संबंधितास परत करण्यात येईल परंतु त्यावर कोणतेही व्याज देण्यात येणार नाही. तसेच करारनामा हा रू. १००/— च्या मुद्रांकावर करण्यात येईल व तो नोटरी करून द्यावा लागेल.

३. दुकानाची रक्कम मान्य झालेल्यांनी कायदेशीर प्रमाणपत्रांसह दुकानाचा ताबा वितरीत झाल्याचे दिनांकापासुन ३ दिवसाचे आत घ्यावा लागेल.

४. दुकानाचे किंवा त्याठिकाणी इतर कोणतेही नुकसान झाल्यास उपरोक्त सुरक्षा रकमेतून झालेल्या नुकसानाचे मुल्यांकन करून तेवढी रक्कम परस्पर वळती करण्यात येईल व याचे सर्व अधिकार विद्यापीठाकडे राखीव राहतील.

५. वितरीत झालेल्या दुकानामध्ये पोट—भाडेकरू किंवा दुस—या व्यवसायास देता येणार नाही. असे निदर्शनास आल्यास त्याचक्षणी सुरक्षा रक्कम कोणतीही पुर्वसुचना न देता जप्त करण्यात येईल व दुकानाचा ताबा विद्यापीठ स्वत:कडे घेईल.

६. दुकान भाडयाने घेण्याकरीता सादर केलेल्या निविदे/दाव्यासोबत सर्व आवश्यक कायदेशीर प्रमाणपत्रे (शॉप ॲक्टनुसार) सादर करणे बंधनकारक राहील.

७. दुकानामध्ये कामगार कायद्यानुसार बालकामगार कामावर ठेवू नयेत तसेच किमान वेतन कायद्यानुसार संबधीतांना वेतन दिल्या जाईल याची दक्षता दुकानदारावर राहील व अशाप्रकरणी कोणताही वाद उदभवल्यास त्यास संबधीत दुकानदार संपुर्णत: जबाबदार राहील.

८. दुकानाच्या व्यवसायानुरूप कोणतीही चोरी, नैसर्गिक आपत्ती, आग, शॉटसर्कीट व इतरपासुन हानी झाल्यास त्याची कोणतीही नुकसान भरपाई विद्यापीठाकडुन दिल्या जाणार नाही.

९. सदर ठिकाणची दुकाने व त्यामधील व्यवसाय हा विविध वसतीगृहांमध्ये वास्तव्यास असलेल्या विद्यार्थ्यांशी संबधीत व त्यांचे सोयीसाठी असल्यामुळे त्याठिकाणी देणी—घेणी, उधारी व इतरबाबत वादविवाद होणार नाही याची दक्षता संबधीत दुकानदारांनी घ्यावी व याची सर्वस्वी जबाबदारी दुकान ताब्यात असणारांची राहील. तसेच विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारे खाद्यपदार्थ व साहीत्य वाजवी दरात व चांगल्या गुणवत्तेचे असावे, याची काळजी घ्यावी.

१०. व्यवसायानुरूप निघत असलेला घान कचरा, सांडपाणी नियोजीत ठिकाणीच टाकावा लागेल. जेणेकरून संपुर्ण परिसर नेहमी स्वच्छ व प्रसन्न राहील याची खबरदारी दुकान भाडेकरूंची राहील.

११. कोणत्याही व्यवसायाशी संबधीत कोणतेही नुकसान, हानी किंवा जिवित हानी झाल्यास त्याची जबाबदारी संबधीत दुकानदारांची राहील यासाठी विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही.

१२. क्रमांकानुसार प्रत्येक दुकानाच्या इमारतीमध्ये विद्यापीठाने ठरवुन दिलेल्या व्यवसायाशिवाय दुस–या व्यवसायाकरीता सदर दुकानाचा उपयोग करता येणार नाही. परंतु व्यवसायाशी संलग्न असलेल्या साहित्याची विक्री करता येईल.

१३. ठरलेले प्रत्येक महीन्याचे भाडे दरमहा पाच तारखेपर्यंत विद्यापीठ अभियंता यांचे कार्यालयात न चुकता भरावे तसेच विद्युत बिलाचा भरणासुध्दा दरमहा करावा व सदरबाबतची पावतीची सत्यप्रत कार्यालयात जमा करावी लागेल. अन्यथा दंडात्मक कार्यवाही करून करार रद्द करण्यात येईल. रू. १०/– प्रतिदीन प्रमाणे दंड वेगळा भरावा लागेल. तसेच ३ महीने कालावधीपर्यंत भाडे जमा न केल्यास दुकान रिक्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१४. विद्यापीठाच्या पुर्वपरवानगीशिवाय दुकानाच्या इमारतीमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. तसेच विद्युतीकरणासंबंधी लागणारे साहित्य स्वखर्चाने आणावे लागेल व विद्युत पुरवठा करण्याकरिता मिटर बसविण्याची जबाबदारी दुकानधारकाची राहील.

१५. सदर मालमत्ता ही विद्यापीठ मालकीची असल्याने इमारतीस काणतेही नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.

१६. दुकानात कोणत्याही प्रकारच्या आक्षेपार्ह व प्रतीबंधीत वस्तु, सामग्री व स्फोटक पदार्थ ठेवता येणार नाहीत.

१७. भाडेपट्टयाचा करारनामा दोन (२) वर्षे कालावधीसाठी करण्यात येईल. व्यवसाय नोंदणी व करारनामा हा दुय्यम निबंधक यांच्याकडे करण्यात येईल. भाडेकरूची दरम्यानच्या कालावधीतील वागणुक समाधानकारक नसल्यास मुदतपुर्व करार रद्द करण्यात येईल.

१८. उपरोक्त कालावधीत विद्यापीठ अभियंता, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांनी कोणत्याही क्षणी तपासणी केल्यास त्याठिकाणी निदर्शनास आलेली आक्षेपार्ह परिस्थिती आढळल्यास त्याविषयी प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार गठीत केलेल्या समितीकडे राखीव राहतील.

१९. कोणत्याही कारणास्तव विद्यापीठाकडुन दुकान खाली करून देणेबाबत कळविण्यानंतर दुकानाचा ताबा ज्या स्थितीत होता त्याच स्थितीत स्वखुषीने विद्यापीठास रिक्त करून द्यावा लागेल. दुकान रिक्त करण्यास नकार दिल्यास प्रसंगी पोलीस प्रशासन किंवा विद्यापीठाच्या सुरक्षा रक्षकांकडून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

२०. दुकानाकरीता निविदा सादर करतांना रूपये ५०००/– (पाच हजार फक्त) चा विद्यापीठ अभियंता, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला या नावाने देय असलेला राष्ट्रीयकृत बॅंकेचा एफ.डी. आर. (१२ महीने कालावधीचा) जोडण्यात यावा.

२१. प्रत्येक दुकानाकरीता स्वतंत्र निविदा सादर करावी लागेल व निविदेमध्ये दर्शविलेले दर हे मासीक भाडयाचे दर असल्याचा तसेच दुकानाचा क्रमांक व व्यवसाय याचा निविदेमध्ये व निविदा सादर केलेल्या लिफाफ्यावर स्पष्ट उल्लेख करावा. याप्रसंगी एका अर्जदाराला दोन पेक्षा जास्त दुकाने देण्यात येणार नाही.

२२. दुकाना संबंधीत कोणताही वाद निर्माण झाल्यास याबाबत मा. कुलगुरू, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा निर्णय अंतीम राहील व सदर निर्णय दोन्ही पक्ष कारास बंधन कारक राहील.

**दुकान क्र. १** हे मोबाईल शॉपी किंवा सलुन व्यवसायासाठी देण्यात येईल.

**दुकान क्र.** ४ हे डी.टी.पी., कॉम्प्युटर वर्क, इंटरनेट कॅफे, स्टेशनरी व संलग्न व्यवसायासाठी देण्यात येईल.

वरील शर्ती व अटींना अनुसरून मी दुकान क्र. ———— करीता रू. ————————/—
अक्षरी रूपये ———————————————————————————————————————
प्रतीमाह भाडयाने चालविण्यास तयार आहे.

करारनामा, उपरोक्त शर्ती व अटी हया दुकान भाडयाने घेण्या—यास बंधनकारक राहतील.

—————————————————

**निविदाधारकाची स्वाक्षरी**

| | | | |
|---|---|---|---|
| **साक्षीदार :—** | **संपुर्ण नांव** | :— | ——————————————————— |
| १) ——————————————————— | **पत्ता व दुरध्वनी /भ्रमणध्वनी क्र.** | :— | ——————————————————— <br> ——————————————————— |
| २) ——————————————————— | | | |